# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
## टोल फ्री क्रमांक - 1064
## कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 05.04.2021.

**बोरगाव फदाट ता. जाफ्राबाद सजाचे तलाठी श्री. अगतराव श्रीधर वीर यांचेसह एका खासगी इसमास 40,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगहात पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. लोकसेवक श्री. अगतराव श्रीधर वीर वय 40 वर्षे, तलाठी सजा बोरगाव फदाट ता जाफ्राबाद जि जालना ह.मु भोकरदन जि. जालना मुळ रा. डोकी ता जि उस्मानाबाद<br>2. श्री. आकाश संजय वाघ वय 25 वर्षे, रा. बोरगाव मठ ता. जाफ्राबाद जि. जालना (खासगी इसम) |
| 2 | गुन्हा घडला ता व ठिकाण | :- | दि. 05.04.2021 रोजी तक्रारदार यांचे घरी भराडखेडा ता.जाफ्राबाद जि.जालना |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 40,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार हे रॉयल्टीवर ट्रॅक्टरव्दारे वाळु वाहतुक करीत असुन बोरगाव फदाट सजाचे तलाठी श्री. अगतराव श्रीधर वीर यांनी पकडले, तसेच यापुढे ट्रॅक्टरव्दारे वाळु वाहतुक चालु दयाची असेल तर मला पैसे दयावे लागतील, असे म्हणुन तक्रारदार यांची मोटारसायकल ठेवुन घेतली, तसेच यापुढे वाळु वाहतुक चालु देण्यासाठी मला हप्ता दयावा लागेल आणि तुझी मोटारसायकल परत देण्यासाठी असे म्हणुन 60,000/- रुपयांची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 05.04.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचेकडे बोरगाव फदाट सजाचे तलाठी लोकसेवक श्री. अगतराव श्रीधर वीर यांनी तक्रारदारास तुझी ट्रॅक्टरची वाळु वाहतुक चालु देण्यासाठी मला हप्ता दयावा लागेल आणि माझ्याकडे असलेली तुझी मोटारसायकल तुला घेवुन जायची असेल तर मला पैसे दयावे दयावे लागतील, असे म्हणुन तलाठी लोकसेवक श्री. अगतराव श्रीधर वीर यांनी व खासगी इसम श्री. आकाश वाघ याने तक्रारदार यांचेकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झालेवरुन आज दि. 05.04.2021 रोजी तक्रारदार यांचे गावी भराडखेडा ता जाफ्राबाद जि जालना येथे सापळा लावला असता खासगी इसम नामे आकाश संजय वाघ याने तक्रारदार यांचेकडुन 40,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने रंगेहाथ पकडले.

लोकसेवक श्री. अगतराव श्रीधर वीर वय 40 वर्षे, तलाठी सजा बोरगाव फदाट ता जाफ्राबाद जि जालना ह.मु भोकरदन जि. जालना मुळ रा. डोकी ता जि उस्मानाबाद (वर्ग - 3) व खासगी इसम श्री. आकाश संजय वाघ वय 25 वर्षे, रा. बोरगाव मठ ता. जाफ्राबाद जि. जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.